'Uniresearch'- International Multidisciplinary E-Research Journal
*Global Impact Factor* [GIF] - *0.234 [2013]*, [CIF] – *3.020 [2015]*
Vol. VII Issue –IV
ISSN 2321-4953 *(Online)*
October - 2016

# सिनेमा आणि समाज शिक्षण : सैराटच्या निमित्ताने....

प्रा. डॉ. सुरेश पाटील,
य.च.म.मु.विद्यापीठ,
नाशिक

"समाज कीर्तनाने सुधारला नाही आणि तमाशा-सिनेमाने बिघडला नाही. 'राजा हरिश्चंद्र' पाहून लोक सत्यवादी होत नाहीत. 'रंग दे बसंती' पाहून क्रांतिकारक होत नाहीत. आणि 'तानी' पाहून मुली कलेक्टर होत नाहीत." सैराट सिनेमाच्या निमित्ताने पुढे आलेली आणि सामान्य जनतेच्या टाळ्या घेऊन जाणारी ही विधाने आहेत.

खरोखरच प्रत्यक्षात आजवर किर्तनाने किती समाज सुधारला आणि तमाशा-सिनेमाने किती बिघडला, किती प्रमाणात बिघडला यासंबंधित कोणतीही शास्त्रीय आकडेवारी आपणाकडे उपलब्ध नाही. अर्थात अशी आकडेवारी शोधून काढणे अवघड काम आहे. मुळात विशिष्ट समाजातील, विशिष्ट वयोगटातील किती टक्के लोकांनी कीर्तन-तमाशा-सिनेमातील कोणकोणती मूल्ये स्वीकारून ती आचरणात आणली आणि त्यामुळे त्या समाजाचा किती फायदा किंवा तोटा झाला, हे वस्तुनिष्ठपणे शोधून काढणे आत्यंतिक किचकट काम आहे. ही बाब समाजाच्या मानसिकतेशी संबंधित असल्यामुळे तंतोतंत निष्कर्ष अशक्यप्राय असतात. परंतु समाजमनावर या घटकांचा परिणाम होत नाही, असे म्हणणे म्हणजे आपली आणि समाजाचीही फसवणूक करण्यासारखेच आहे !

सर्वसामान्य माणसाला समाजात वावरताना चांगल्या मुल्यांची जोपासना करून ते आचरणात आणणे अवघड असते. तर अनिष्ट, वाईट अथवा विघातक मुल्यांची जोपासना आणि आचरणही तुलनेने सोपे आणि सहजसाध्य असते. वर्षभर मन लावून अभ्यास करून पास होणे अवघड आणि प्रयत्नसाध्य असते. परंतु नापास होण्यासाठी प्रयत्न करावे लागत नाहीत. दोन्ही कृतींची परिणती ठरलेली असते. वर्षभर अभ्यास करून पास झाल्यानंतर होणारा आनंद, त्यातून कुटुंबामध्ये नि समाजामध्ये मिळणारी प्रतिष्ठा कोठे? आणि नापास झाल्यानंतर किंवा कॉपी करताना पकडले गेल्यानंतर होणारा मनस्ताप कोठे?

आंतरराष्ट्रीय स्तरांवर झालेलं संशोधन असं सांगतं कि कोणत्याही समाजात केवळ सात- आठ टक्के लोक असे असतात कि त्यांच्यावर सिनेमा, नाटक, कीर्तन तसेच समाजात घडणाऱ्या अनुकूल - प्रतिकूल घटनांचा काहीही परिणाम होत नाही. हे लोक बौद्धिक आणि भावनिकदृष्ट्या कणखर आणि वरिष्ठ श्रेणीतील असतात. परंतु त्याच समाजातील सात- आठ टक्के लोक असे असतात, कि त्यांच्यावर वरील घटकांचा तात्काळ परिणाम होतो. या गटातील लोक बौद्धिक आणि भावनिकदृष्ट्या कमकुवत म्हणजे निम्न श्रेणीतील असतात. कोणत्याही समाजात अशा दोन्ही श्रेणीत लोक असतात. या दोन्ही श्रेणींत अशिक्षित असतात तसे सुशिक्षितही असतात.

वरिष्ठ श्रेणीतील लोक सिनेमा-तमाशा-कीर्तन यांच्याकडे तटस्थपणे पाहू शकतात. सिनेमा-तमाशा-कीर्तन यांमधून प्रसृत होणाऱ्या समाजविकासक किंवा समाजविघातक मुल्यांकडेही ते तटस्थपणे पाहू शकतात. आपल्याला हवे ते घ्यायचे आणि नको त्याकडे दुर्लक्ष करण्याइतपत विवेक त्यांच्याकडे असतो. असा नीरक्षीरविवेक निम्न श्रेणीतील गटाकडे नसतो. सिनेमात दाखविल्या जाणाऱ्या अमानवी घटना आणि स्टंटचा निम्नस्तरीय गटावर तात्काळ प्रभाव पडतो. ते अशा घटनांचे अनुकरण करतात. अनेकदा

अंधानुकरण करतात. सिनेमातील घटना काल्पनिक असतात. त्यांचे अनुकरण आणि प्रत्यक्ष आचरण करताना सामाजिक संकेतांचे आणि मूल्यांचे उल्लंघन होऊन गंभीर प्रश्न तयार होत असतात.

कीर्तनाने प्रसृत होणारी तत्वे अथवा मूल्ये अंगीकारणे आणि ते आचरणात आणणे, आणि दीर्घकाळ आचरणात अवघड असते. सिनेमाचे अनुकरण सोपे असते. यामुळेच सिनेमातील गाणी पटकन ओठांवर येतात. रेंगाळतात. अभंगाचे असे होत नाही. आपले भविष्य शिक्षणाशी जोडलेले आहे, हे माहीत असुनदेखील पाठ्यपुस्तकातील कवितांपेक्षा सिनेमातील गाणी ओठावर येतात. पाढे पाठांतर दूरवरची बाब आहे ! सिनेमा आणि तत्सम मनोरंजनाच्या माध्यमांद्वारा प्रसृत होणारी मूल्ये अंगिकारण्यासाठी कष्ट पडत नसल्याने ती पटकन स्वीकारली जातात. यातूनच गाड्या उडविणे, हिरोगिरी करणे, कट्टे झिजविणे, टवाळ्या करणे, मारामाऱ्या- गुंडगिरी - भाईगिरी करणे, व्यसनाधीन होण्यात पुरुषार्थ समजणे, अशांसारख्या व्यक्तिमत्व - विघातक तत्वांचा स्वीकार केला जातो. शालेय - महाविद्यालयीन काळात अभ्यास आणि करिअरची चिंता न करता नको त्या उचापती करणे, हे देखील अशाच मानसिकतेतून घडत असते. पूर्वी सिनेमा पाहण्यासाठी थिएटरमध्ये जावे लागत असे. आजच्या घडीला हे शिक्षण केवळ घराघरात नव्हे तर प्रत्येक हातात उपलब्ध आहे. ते अनुकरण स्वस्त असल्याकारणाने त्याचा समाजमनावर परिणाम होतोच ! सिनेमा, कीर्तन आणि माध्यमांचा समाजावर कोणताही परिणाम होत नाही, असे म्हणणे चुकीचे आहेच ! तसेच अविवेकी आहे ! त्याबरोबरच दांभिकपणाची दुर्गंधी या मतप्रणालितून निपजताना दिसते आहे !!

कीर्तन-प्रवचन, उदबोधनपर व्याख्याने, समाज-सुधारक व्यक्ती, त्यांचे साहित्य, चिंतनशील साहित्य, विदग्ध साहित्य, थोरांची चरित्रे इत्यादींचाही समाजमनावर परिणाम होतच असतो. परंतु हा परिणाम तात्काळ दिसत नाही. या घटकांद्वारा समाजात पाझरणारी मूल्ये अल्पकाळात दिसून येत नाहीत. ती तशी अल्पकाळासाठी दिसून समाजाचा फायदाही होत नाही. उदात्त मूल्ये क्षणिक काळापुरते आचरणात आणून समाजापुढे आदर्श उभा राहात नाही. आयुष्यभर उदात्त मूल्ये आचरणात आणली तरच संत तुकाराम, संत गाडगेबाबा, साने गुरुजी, मदर तेरेसा, अब्दुल कलाम, अण्णा हजारे यांसारखी व्यक्तिमत्वे समाजासमोर येत असतात. दगडाचे सुबक मूर्तीत रुपांतर होताना त्याला हातोड्याचे आणि छन्नीचे असंख्य घाव सहन करावे लागत असतात. देवत्व प्राप्त होण्यासाठीही असंख्य घाव, टक्के-टोणपे आणि अमाप कष्ट सोसावे लागतात. राम, कृष्ण, गौतम बुद्ध, वर्धमान महावीर, महमंद पैगंबर, संत ज्ञानेश्वर, इतर संतमंडळी सर्वजण आपल्यासारखी माणसेच होती. पण आपल्या कार्यकर्तृत्वाने आणि आचरणाने ते अद्वितीय झाले. त्यांची मंदिरे झाली आणि समाज त्यांची आज पूजा करतो. कीर्तन आणि संतसाहित्याची निर्मिती आणि परंपरा हजारो वर्षांपासून चालत आलेली आहे. त्यांची आजही पारायणे होतात. त्यानंतर सतराव्या- अठराव्या शतकापासून निर्मिती होणाऱ्या तंत म्हणजे शाहिरी वाङ्मयाला समाजाच्या सर्व स्तरांवर आजही मान्यता मिळताना दिसत नाही. याकडे विलासी वाङ्मय म्हणूनच पाहिले जाते.

बौद्धिक आणि भावनिकदृष्ट्या कमकुवत व्यक्ती आणि मुले आचरणास सहजसाध्य घटना-घडामोडींनी लवकर प्रभावित होतात. टाईमपाईस, सैराट असे सिनेमे समाजातील सर्व वयोगटातील लोकांना वेड लावतात. परंतु किशोरवयीन मुलांच्या मानसिक विश्वात आत्यंतिक खळबळ माजवतात. त्यांना विचलित करतात. बौद्धिक, भावनिक, शारिरीक, सामाजिक विकास होऊन आयुष्याची पायाभरणी करण्याच्या वयात ही कोवळी मुले दिवास्वप्नांत गुरफटण्याचीच शक्यता वाढताना दिसते. सिनेमाकडे एक कला म्हणून पाहावे, हे खरे असले तरी त्यातील काय घ्यावे आणि काय सोडून द्यावे एवढी नीरक्षीरविवेकाची अपेक्षा किशोरवयीन मुले तसेच बौद्धिक आणि भावनिकदृष्ट्या निम्नश्रेणीतील लोकांकडून ठेवणे अवास्तव आहे. आयुष्याला

'Uniresearch'- International Multidisciplinary E-Research Journal
*Global Impact Factor* [GIF] - *0.234 [2013],* [CIF] – *3.020 [2015]*
Vol. VII Issue –IV
ISSN 2321-4953 *(Online)*
October - 2016

कोणतीही दिशा प्राप्त होण्यापूर्वी केवळ शारीरिक- मानसिक आकर्षणाच्या आहारी जाऊन सैराट- टाइमपासमधील स्वस्त मूल्यांचे अनुकरण होते. आमची नवी आणि कोवळी पिढी अशांसारखी स्वस्त मूल्ये अंगिकारून स्वतःला विलासी आणि मदमस्त गर्तेत झोकून देत असेल तर मग ऑलिम्पिकमधील पदकांची आणि महासत्ता होण्याची आपण केवळ दिवास्वप्ने पहावीत !

सैराटमधील किशोरवयीन मुलांचे नको त्या वयात शारीरिक- मानसिक आकर्षणाच्या आहारी जाणे जसे समर्थनीय नाही, तसे तरूण- तरुणी एकत्र आल्यानंतर डोक्यात नसती राख आणि खोटी प्रतिष्ठा डोक्यात ठेऊन दोघांचा शेवट घडवून आणणेही समर्थनीय नाही ! या दोन्हीही प्रवृत्ती आणि आचरणे समाजहिताच्या नाहीत ! अशा प्रवृत्तीचे आचरण कमकुवत लोकांकडून होत असते. अशा प्रवृत्तीकडूनच चोऱ्या- दरोडे-खून-बलात्कार अशी समाजविघातक कृत्ये घडत असतात. अशीच माणसे पैसे दुप्पट करून देणाऱ्याकडे आणि पैशांचा पाऊस पाडणा ऱ्याकडे स्वतः जातात. असेच लोक आजारी पडल्यावर डॉक्टरांकडे न जाता वैदू आणि भोंदू बाबांकडे जातात. याच प्रवृत्तीचे तरुण शिक्षीत असूनही अतिरेकी कारवायांमध्ये सामील होतात.

सैराटसारख्या व्यावसायिक सिनेमांमधून मिळणारा आनंद क्षणिक आणि तात्कालिक असतो. कीर्तन- प्रवचन, तत्सम कार्यक्रम तसेच राजा हरिश्चंद्र, तानी, संत तुकाराम, शामची आई अशा सिनेमांमधून सर्वांनाच तात्काळ आनंद मिळेल असे नाही. परंतु व्यक्ती आणि समाज विकासासाठी पूरक मूल्यांचे अभिसरण आणि दीर्घकालीन संस्कार हळुवारपणे का होईना पण निश्चितपणे होतात. यातून वैयक्तिक आणि सामाजिक हितही साधले जाते. सिनेमातील स्टंटबाजी वैयक्तिक आयुष्यात केल्याने पश्चातापाची पाळी येते.

काही सिनेमे, व्यक्ती, संस्था, घटना, प्रसंग किशोरवयीन समाजातील निम्न श्रेणीतील लोकांना सहज भुरळ घालतात. हिप्नोटाइझ करतात. यामुळेच लादेनच्या संघटनेत असंख्य इंजिनिअरही सहभागी होतात. देशद्रोही म्हणून सिद्ध झालेल्या आणि तुरुंगवास भोगणाऱ्या सिने अभिनेत्याचेही असंख्य चाहते आढळून येतात. मायकेल जॅक्सनच्या केवळ दर्शनाने त्याचे चाहते चित्कारतात आणि अंगावरचे कपडेही फाडतात. या साऱ्या गोष्टी करणं सोप असते. त्यासाठी कष्टाची किंवा साधनेची गरज नसते.

जसे कीर्तनातील संस्कारशील मूल्यांचे सामाजिक अभिसरण अतिशय संथ आणि सूक्ष्मपणे होत असते. तसे राजा हरिश्चंद्र, तानी, संत तुकाराम, शामची आई अशांसारख्या सिनेमांचाही सकारात्मक परिणाम समाजमनावर होतच असतो. मात्र ही संख्याही तशी कमीच असते. म्हणूनच या सिनेमांना आणि कीर्तनालाही सैराटसारखी गर्दी कधीही जमत नाही. महिना पंधरा दिवस कीर्तनाला हजेरी लाऊन संत होता येत नाही ! तानी पाहून दोन दिवसात कलेक्टर होता येत नाही, पण सैराट पाहता पाहताच झिंगायला सुरुवात होते. ही झिंग व्यक्तीच्या आणि समाजाच्या हिताची नसते एवढे मात्र खरे !!